**१३ व्या वित्त आयोगांतर्गत कामांची निवड करणेसाठी ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक ३०/०८/२०१० अन्वये खालील तपशिलाप्रमाणे जिप पंस ग्रापं स्तरासाठी मार्गदर्शक तत्वे निर्गत केली आहेत.**

| अ.क्र | जिल्हा परिषद स्तर | पंचायत समिती स्तर | ग्रामपंचायत स्तर | तीनही स्तरासाठी समाईक बाब |
|---|---|---|---|---|
| १ | संगणकीय कामकाजासाठी कंत्राटी पध्दतीने संगणक तज्ञांची नेमणूक करणे | संगणकीय कामकाजासाठी कंत्राटी पध्दतीने संगणक तज्ञांची नेमणूक करणे | कामाच्या तांत्रिक देखरेखेसाठी कंत्राटी पध्दतीने तंत्रज्ञ नेमणे | पंचायत राज संस्थानी त्यांचे लेखे प्रियासॉप्ट या संगणकीय आज्ञावलीत ठेवणेसाठी संगणक व साहित्य उपलब्ध करणे |
| २ | पंचायत समित्यामधील टाऊन प्लॅनिंग तज्ञाने तयार केलेल्या नियोजन आराखडा व पर्यावरण विकास आराखडा याच्या देखरेख व अंमलबजावणीसाठी टाऊन प्लॅनिंग अधिका-याची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे | पंचायत समिती अंतर्गत टाऊन प्लॅनिंग तज्ञाने तयार केलेल्या नियोजन आराखडा व पर्यावरण विकास आराखडा याच्या देखरेख व अंमलबजावणीसाठी टाऊन प्लॅनिंग अधिका-याची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे | लेखे ठेवण्यासाठी कंत्राटी पध्दतीने लेखपाल नेमणे | पंचायत राज संस्थामधील मनुष्यबळ विकास करणे आणि त्या संस्था नागरीकांना पुरविण्यासाठी व कामाच्या संदर्भात अधिक कार्यक्षम व लोकभिमुख होण्यासाठी त्यांचे आय एस ओ प्रमाणिकरण करणे |
| ३ | जिल्हा परिषदे अंतर्गत येणा-या इतर जिल्हा मार्गांची देखभाल, दुरूस्ती व बांधकाम | पंचायत समिती क्षेत्राअंतर्गत गावांना जोडणा-या रस्त्यांचे बांधकाम देखभाल, दुरूस्ती | संगणकीय कामकाजासाठी कंत्राटी पध्दतीने संगणक तज्ञांची नेमणूक करणे | कर्मचारा-यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी बायोमेट्रिक प्रणाली कार्यरत करणे |
| ४ | राज्यनिधीतून ब वर्ग दर्जाच्या ज्या तिर्थक्षेत्रांना बांधकाम निधी दिला आहे त्या ब वर्ग दर्जाच्या तिर्थक्षेत्रांची देखभाल व दुरूस्ती करणे | जिल्हा नियोजन मंडळाने ज्या क वर्ग तिर्थक्षेत्रांना बांधकाम निधी दिला आहे त्या क वर्ग दर्जाच्या तिर्थक्षेत्रांची देखभाल व दुरूस्ती करणे | गावाचा नियोजन आराखडा व पर्यावरण विकास आराखडा तयार करण्यासाठी टाऊन प्लॅनिंग तज्ञांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे | सॉफ्टवेअर्स अदयावत ठेवून माहिती तयार करणेसाठी व पुरविण्यासाठी नोडल हॅंड होल्डिंग एजन्सीच्या सेवा उपलब्ध करणे |
| ५ | जिल्हा परिषद अंतर्गत निर्माण झालेल्या विविध मत्तांची देखभाल व दुरूस्ती करणे | पंचायत समिती क्षेत्राअंतर्गत निर्माण झालेल्या विविध मत्तांची देखभाल व दुरूस्ती करणे | ग्रामपंचायत क्षेत्राअंतर्गत निर्माण झालेल्या विविध मत्तांची देखभाल व दुरूस्ती करणे | सर्व स्तरामार्फत विविध सोईसुविधा पुरविण्याठी ई पी आर आय ची अंमलबजावणी करणे. |
| ६ | ग्रामपंचायत कार्यालय/ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्यांची देखभाल व दुरूस्ती या कामासाठी निधी कमी पडत असल्यास जि.प.स्तरावरील निधी उपलब्ध करून देता येईल. | ग्रामपंचायत कार्यालय/ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्यांची देखभाल व दुरूस्ती या कामासाठी निधी कमी पडत असल्यास पंचायत समिती स्तरावरील निधी उपलब्ध करून देता येईल. | गावांतर्गत गटारे व गावांतर्गत रस्ते बांधकाम तसेच त्यांची देखभाल व दुरूस्ती | अपारंपारिक उर्जेचा वापर वाढविण्यासाठी सौरउर्जेवरील उपकरणे व अद्यावत तंत्रज्ञान पंचायत राज संस्थाना उपलब्ध करून देणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | दहनभूमी/दफनभुमीची देखभाल व दुरूस्ती | दहनभूमी/दफनभुमीची देखभाल व दुरूस्ती | ग्रामपंचायत कार्यालय/ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्यांची देखभाल व दुरूस्ती | पंचायत राज संस्थासाठी आगीसारख्या आपत्तीच्या निवारणार्थ उपाय योजना करणे |
| ८ | आरोग्य व घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत कामे | आरोग्य व घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत कामे | दहनभूमी/दफनभुमीची देखभाल व दुरूस्ती | ग्रामपंचायतीना, अंगणवाडयांना प्राथ.शाळांना दवाखान्यांना आवश्यक साईसुविधा पुरविणे |
| ९ | घनकचरा प्रक्रियेसाठी पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरून शास्त्रिय पध्दतीनें कमी खर्चाचे प्रकल्प हाती घेणे. | घनकचरा प्रक्रियेसाठी पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरून शास्त्रिय पध्दतीनें कमी खर्चाचे प्रकल्प हाती घेणे. | आरोग्य व घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत कामे | पंचायत राज संस्थाच्या सर्व स्तरावर राबविल्या जाणा-या शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसिध्दी करणे |
| १० | पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योंजनेसंबधी ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या दि १८/१०/२०१० च्या शासन निर्णयात अंतर्भुत असलेल्या विविध बाबीसाठी पुरक निधी म्हणून या निधीचा वापर करणे | पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योंजनेसंबधी ग्रामविकास विभागाने निर्गमित केलेल्या दि १८/१०/२०१० च्या शासन निर्णयात अंतर्भुत असलेल्या विविध बाबीसाठी पुरक निधी म्हणून या निधीचा वापर करणे | घनकचरा प्रक्रियेसाठी पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरून शास्त्रिय पध्दतीनें कमी खर्चाचे प्रकल्प हाती घेणे. | पंचायत राज संस्थाच्या सर्व स्तरावर महिला शक्ती अभियान राबविणेसाठी आवश्यक त्या पुरक तरतूदी करणे |
| ११ | | | पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योंजनेसंबधी ग्रा. वि. निर्गमित केलेल्या दि १८/१०/२०१० च्या शासन निर्णयात अंतर्भुत असलेल्या विविध बाबीसाठी पुरक निधी म्हणून या निधीचा वापर करणे | |
| १२ | | | ग्रामपंचायत/ग्रामपंचायत सभा यांच्या दृकश्राव्य चित्रीकरणाची व्यवस्था करण्यासाठी आवश्यक उपकरणे/साधने घेणे व त्यासाठी तंत्रबळ उपलबध करून घेणे | |